RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक १२२] शुक्रवार, सप्टेंबर ११, २०२६/भाद्रपद २०, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ५२३**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## गृह विभाग

मंत्रालय (मुख्य इमारत), दुसरा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ सप्टेंबर २०२६.

### शुद्धिपत्रक

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक डीजीओ-०८२६/प्र.क्र.३०४/पोल-०४.—महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम ५ (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या अंतर्गत असलेल्या पोलीस दलाच्या श्वान पथकातील पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक, गट-अ (राजपत्रित), पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक, गट- ब (अराजपत्रित), पोलीस हवालदार (श्वान पथक), गट-क या पदांच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करण्यात येत आहेत. याबाबत दिनांक २८ जून २०२३ रोजी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

या आदेशामधील नियम क्र. ५ मधील (२) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे—

" श्वान पथकातील पोलीस हवालदार (श्वान पथक), गट-क या पदावरील नियुक्ती, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे येथे आयोजित केलेले मूलभूत प्रशिक्षण (बॉम्बशोधक व अंमलीद्रव्ये यामधील सहा महिन्यांचे आणि भारतीय दंड संहिता गुन्हे शोधाबाबतचे नऊ महिन्यांचे) यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर करण्यात येईल ".

या ऐवजी नियम क्र. ५ मधील (२) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे—

" श्वान पथकातील पोलीस हवालदार, श्वान पथक गट-क या पदावरील नियुक्ती ही गुन्हे अन्वेषण विभाग पुणे येथील श्वान प्रशिक्षण केंद्र येथे किंवा केंद्र शासन अथवा इतर राज्यातील शासकीय श्वान प्रशिक्षण केंद्र येथे आयोजित केलेले मूलभूत प्रशिक्षण (बॉम्ब शोधक किंवा अंमलीद्रव्ये यासाठी विहित असलेले एक सहा महिन्याचे प्रशिक्षण किंवा भारतीय दंड संहिता गुन्हे शोध बाबतचे नऊ महिन्यांचे या तिन्ही पैकी कोणतेही एक प्रशिक्षण) यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर करण्यात येईल."

ही सुधारणा सेवा प्रवेश नियमाचे मूळ आदेश क्र.डिजीओ ०८१६/प्र.क्र.३०१/पोल-४, दिनांक २८ जून २०२३ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अर्चना वालझाडे,**
शासनाच्या उप सचिव.